Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शुक्रवार, दि. २४ जूलै २०२६ । वर्ष १ ।अंक १०६ ।पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306
DIGITAL EDITION

**उमेद अभियानातील ३८ मशीन बंद; भ्रष्टाचाराच्या चौकशीची मागणी**

(पान २ वर)



» Selected

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जळगाव अधीक्षकपदी प्रदीप पोटे यांची नियुक्ती

जळगाव | प्रतिनिधी: राज्य उत्पादन शुल्क विभागाचे जळगाव येथील अधीक्षक डॉ. व्ही. टी. भूकन यांची नाशिक येथे बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी प्रदीप पोटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सांगली येथे अधीक्षक म्हणून कार्यरत असलेले प्रदीप पोटे यांची बदली जळगाव येथे करण्यात आली असून त्यांनी नुकताच अधीक्षक पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. दरम्यान, डॉ. व्ही. टी. भूकन यांनी जळगाव येथे अधीक्षक म्हणून कार्य केल्यानंतर त्यांची नाशिक येथे बदली करण्यात आली आहे. नव्या नियुक्तीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कामकाजाला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### विद्यार्थ्यांवर अमानुष लाठीमाराच्या निषेधार्थ महाराष्ट्र बंद

# वंचित'च्या बंदला राज्यभर प्रतिसाद

### व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवली, मुर्तीजापूरची घटना वगळता बंद शांततेत

जन सम्राट टाईम्स

**मुंबई। नीट' पेपरफुटीप्रकरणी विविध मागण्यांसाठी दिल्लीमध्ये जंतरमंतर येथे आंदोलन करत असलेल्या विद्यार्थ्यांवर केलेल्या अमानुष लाठीमाराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने गुरुवारी पुकारलेल्या राज्यव्यापी बंदला चांगला प्रतिसाद मिळाला.**



राज्यातील अनेक शहरांमध्ये वंचितचे कार्यकर्ते व्यापाऱ्यांना दुकाने बंद ठेवण्याची शांततापूर्ण मार्गाने विनंती करताना दिसत होते. वंचितच्या बंदला राज्यव्यापी प्रतिसाद मिळण्याची अलिकडच्या काळातील ही पहलीच घटना आहे. वंचितने केवळ आपल्या संघटनेच्या बळावर बंद यशस्वी केला. या बंदला वंचितचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे राजकीय प्रभावक्षेत्र असलेल्या पश्चिम विदर्भात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. भाकप, माकप, शेकाप हे डावे पक्ष, काही कामगार संघटना तसेच भारतीय बौद्ध महासभा यांचे कार्यकर्ते या बंदमध्ये मोठ्या संख्येने उतरले होते. अनेक ठिकाणी व्यापारी वर्गांनी उत्फुर्तपणे पेठा बंद ठेवून बंदमध्ये भाग घेतला. काँग्रेसने या आंदोलनास पाठिंबा दिला होता. अकोला जिल्ह्यातील मुर्तजापूर येथील काही दुकान तोडफोडीची घटना वगळता बंद राज्यभर शांततेत झाला. नागपूरमध्ये संविधान चौक ते बर्डी मार्गावर मोर्चा काढण्याचा प्रयत्न करणाऱ्या वंचितच्या आंदोलकांना पोलीसांनी ताब्यात घेतले. या मोर्चात पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. धुळे शहरात बंद कडकडीत झाला. पुण्यात भिडे वाडा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा वंचितकडून मोर्चा काढण्यात आला. 'दिल्ली पोलीस मुर्दाबाद' आणि 'धर्मेंद्र प्रधान इस्तीफा दो' याघोषणा सर्वत्र दिल्या गेल्या. छत्रपती संभाजीनगर मध्ये पैठणगेट, औरंगापुरा येथे व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवली. कोल्हापूर, सोलापूर, बुलढाणा, नांदेड, नंदुरबार, गडचिरोली येथेही बंदचे पडसाद उमटले. दिंडोरी, वणी, अक्कलकोट, तेल्हारा, तिवसा, खोपोली अशा छोट्या शहरांमध्ये व्यापाऱ्यांनी दुकाने बंद होती.

#### पाच दिवसीय बाबूजी महोत्सवाचे आयोजन

मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनस येथे वंचितच्या मुंबई महासचिव प्रणाली कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले. माहीम, वरळी, अणुशक्तीनगर, कुलाबा, सांताक्रूझ, चेबूर, कुर्ला, अमरमहाल सिग्नल येथे वंचितच्या कार्यकर्त्यांनी आंदोलने केली. एरोली येथे ठाणे – बेलापूर महामार्ग आणि मुलुंड येथे सायन – पनवेल हा राष्ट्रीय महामार्ग रोखण्याचा वंचितच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न केला. वंचितच्या हजारो कार्यकर्त्यांना पोलीसांनी ताब्यात घेतले. वंचितचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी मुंबईतील आंदोलनाचे नेतृत्व केले.

## २६ दिवसांनंतर सोनम वांगचूक यांचे उपोषण समाप्त

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी अखेर २६ दिवसांपासून सुरू असलेले आमरण उपोषण समाप्त केले. केंद्रीय आरोग्यमंत्री जेपी नड्डा आणि केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी गुरुग्राम येथील मेदांता रुग्णालयात जाऊन वांगचूक यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी नड्डा यांच्या हस्ते ज्यूस पिऊन उपोषण सोडले.
नीट पेपरफुटी प्रकरणावरून देशभरात आंदोलनाची तीव्रता वाढली असून जंतर-मंतर येथे *कॉक्रोच जनता पार्टी (CJP)*च्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. देशभरातून हजारो विद्यार्थी या आंदोलनात सहभागी झाले असून विविध राज्यांमध्येही आंदोलनाला पाठिंबा देण्यात येत आहे.
दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे आश्वासन दिले. पेपरफुटी प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर कठोर कारवाई सुरू असल्याचे सांगत, पेपरफुटी रोखण्यासाठी स्वतंत्र कठोर कायदा करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.
गेल्या अडीच महिन्यांत या प्रकरणात कठोर पावले उचलण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. उपोषण सोडल्यानंतर सोनम वांगचूक यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म *'एक्स'*वर प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, केंद्रीय मंत्री जेपी नड्डा, डॉ. जितेंद्र सिंह तसेच लेह-लडाखमधील विविध संस्थांच्या वरिष्ठ प्रतिनिधींच्या उपस्थितीत त्यांनी उपोषण मागे घेतले. यापूर्वी विविध राजकीय पक्षांतील ६५ खासदारांनी भेटून किंवा पत्राद्वारे उपोषण समाप्त करण्याची विनंती केली होती. वांगचूक यांनी सांगितले की, हा निर्णय अनेक अटी, दीर्घ चर्चेनंतर आणि देशात संभाव्य हिंसाचार टाळण्याच्या उद्देशाने घेण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## दिल्लीतील विद्यार्थी लाठीचार्जचे धुळ्यात पडसाद

### वंचित बहुजन आघाडीचा आक्रमक



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदच्या पार्श्वभूमीवर धुळे शहरात गुरुवारी आक्रमक आंदोलन करण्यात आले. डाव्या पक्षांनीही या बंदला पाठिंबा दिल्याने शहरात सकाळपासूनच आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले.
आंदोलनाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर शेकडो कार्यकर्त्यांनी शहरातील कराचीवाला खुंट परिसरात एकत्र येत रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईचा निषेध व्यक्त करण्यात आला. आंदोलकांनी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे हे लोकशाहीविरोधी असल्याचा आरोप केला. आंदोलनामुळे काही काळ शहरातील मध्यवर्ती भागातील वाहतूक विस्कळीत झाली होती. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी धुळे पोलिसांनी आंदोलनस्थळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास भविष्यात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी यावेळी दिला.

## कॉमनवेल्थ गेम्स २०२६: भारताचे पदक निश्चित

### लव्हलीना बोरगोहेनची उपांत्य फेरीत धडक

जन सम्राट टाईम्स

**ग्लास्गो | प्रतिनिधी:** कॉमनवेल्थ गेम्स २०२६ च्या अधिकृत उद्घाटनापूर्वीच भारताच्या खात्यात पहिले पदक निश्चित झाले आहे. ऑलिम्पिक पदक विजेती स्टार महिला बॉक्सर लव्हलीना बोरगोहेन हिने ७५ किलो वजनी गटात उपांत्य फेरीत प्रवेश मिळवत भारतासाठी किमान कांस्य पदक निश्चित केले आहे. आसामच्या लव्हलीनाला पहिल्या फेरीत 'बाय' (BYE) मिळाल्याने ती थेट उपांत्य फेरीत पोहोचली. कॉमनवेल्थ गेम्सच्या मुक्केबाजी स्पर्धेच्या नियमानुसार उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या दोन्ही खेळाडूंना कांस्य पदक दिले जाते. त्यामुळे रिंगमध्ये उतरण्यापूर्वीच लव्हलीनाने भारतासाठी पहिले पदक निश्चित केले आहे. लव्हलीना ३१ जुलैपासून आपल्या मोहिमेची सुरुवात करणार असून, अंतिम फेरीत प्रवेशासाठी तिची लढत टी.के.बी.पी. ताफाकी हिच्याविरुद्ध



होणार आहे. या सामन्यात विजय मिळाल्यास ती सुवर्णपदकासाठी अंतिम फेरीत खेळेल. स्पर्धांच्या अधिकृत उद्घाटनापूर्वीच पदक निश्चित झाल्याने भारताच्या १२६ सदस्यीय पथकाचा आत्मविश्वास उंचावला आहे. यंदाच्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये खेळांची संख्या २० वरून १० वर आली असली तरी भारत अनेक स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करण्याच्या तयारीत आहे. भारताचे लक्ष्य पदकतालिकेत अव्वल पाच देशांमध्ये स्थान कायम राखण्याचे आहे.

## २०४७ पर्यंत अणुऊर्जेतून १०० GW वीज निर्मितीचे लक्ष्य

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** भारताच्या न्यूक्लियर एनर्जी मिशनला गती देण्यासाठी केंद्र सरकारने २०४७ पर्यंत अणुऊर्जेतून १०० गिगावॅट (GW) वीज निर्मितीचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य निश्चित केले आहे. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी यासंदर्भात माहिती देत, देशाच्या वाढत्या ऊर्जा गरजा आणि स्वच्छ ऊर्जा उद्दिष्टे लक्षात घेऊन अणुऊर्जा क्षेत्राचा विस्तार केला जाणार असल्याचे सांगितले. या योजनेअंतर्गत प्रस्तावित 'शक्ती' (SHakti) कायद्याद्वारे अणुऊर्जा क्षेत्रात खासगी कंपन्यांनाही सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आतापर्यंत मुख्यत्वे सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या या क्षेत्रात उद्योग आणि व्यावसायिक संस्थांचा सहभाग वाढवून गुंतवणूक, संशोधन आणि तांत्रिक विकासाला चालना देण्याचा सरकारचा मानस आहे. या धोरणात्मक निर्णयामुळे भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राला नवी गती मिळेल. ऊर्जा सुरक्षेला बळकटी मिळण्याबरोबरच कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या आणि स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढविण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टांना मोठी मदत होणार आहे.

## जिल्हा बँक प्रकरण तापले; पोलीस बंदोबस्त वाढवला

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी संबंधित प्रकरणावरून वातावरण तापले असून, सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित परिसरात पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. तसेच कॉलनी परिसरात बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. दरम्यान, JDCCचे संजय पवार यांनी जिल्हा बँकेचा कर्मचारी वेतन व इतर देणी यांच्याशी कोणताही संबंध नसल्याचे केलेले वक्तव्य दिशाभूल करणारे असल्याचा आरोप केला आहे. संजय पवार यांनी म्हटले की, संबंधित टेंडर



फॉर्ममध्येच कर्मचारी वेतनासह इतर सर्व देणी स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहेत. त्यामुळे बँकेचा या देण्यांशी संबंध नसल्याचे सांगणे वस्तुस्थितीला धरून नसल्याचा दावा त्यांनी केला. या प्रकरणामुळे जिल्हा बँकेच्या व्यवहारांबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून, पुढील घडामोडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पावसाने दिला दिलासा; कोमेजलेली पिके पुन्हा तरारली, पर्यावरण संवर्धनाची गरज अधोरेखित

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल | प्रतिनिधी :** यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीला जून महिन्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. तीव्र उष्णतेमुळे पिके कोमेजली, शेतातील ओलावा संपुष्टात आला आणि उकाड्याने जनजीवनही विस्कळीत झाले. यावर्षी जून महिन्यात ढगांची दाटी, विजांचा कडकडाट आणि पावसाची साथ जवळपास नव्हती. मात्र जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून




पावसाने नियमित हजेरी लावण्यास सुरुवात केल्याने परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. सलग पडणाऱ्या पावसामुळे कोमेजलेली पिके पुन्हा तरारली असून शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. शेतांमध्ये हिरवळ बहरली असून खरीप हंगामाला नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र आहे. दरम्यान, हवामानातील सातत्याने होत असलेले बदल चिंतेचा विषय ठरत आहेत. कधी तीव्र उष्णता, कधी दुष्काळसदृश परिस्थिती, तर कधी अतिवृष्टी अशा अनियमित हवामानाचा शेती व पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असल्याचे पर्यावरण अभ्यासकांचे मत आहे. या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे, विद्यमान वृक्षांचे संरक्षण करणे, प्रदूषणावर नियंत्रण आणणे, नद्यांमधील बेकायदेशीर वाळू उपसा थांबवणे तसेच डोंगर-टेकड्यांमधील बेसुमार गौण खनिज उत्खननावर आळा घालणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतल्यास भविष्यात हवामानातील अस्थिरता कमी होण्यास मदत होईल आणि शेतीसह मानवी जीवन अधिक सुरक्षित राहील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## केळी पिकावरील कीड-रोग नियंत्रण व उत्पादनवाढीबाबत मार्गदर्शन

### कृषी विभागाचा उपक्रम; संशोधक व तज्ज्ञांकडून आधुनिक शेती तंत्रज्ञान

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल । प्रतिनिधी:** दिनांक १६ जुलै २०२६ रोजी कढोली येथे शेतकरी प्रशांत अशोक पाटील यांच्या केळीच्या शेतात महाराष्ट्र राज्य कृषी विभागाच्या वतीने शेती शाळा व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री. प्रतीक पाटील यांच्या कार्यक्षेत्रात झालेल्या या कार्यक्रमात केळी पिकावरील कीड-रोग नियंत्रण, उत्पादनवाढ आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मंडळ कृषी अधिकारी ईश्वर पवार यांच्या हस्ते झाली. यावेळी केळी संशोधन केंद्र, जळगावचे डॉ. व्ही. टी. बडगुजर, कृषी विज्ञान केंद्र, ममुराबादचे डॉ. किरण मांडवडे व डॉ. टी. बी. गोरे तसेच जिल्हा उद्योग केंद्र, जळगावचे विजय सैंदाणे यांनी शेतकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. मार्गदर्शनात केळी पिकावरील कीड व रोगांचे प्रभावी व्यवस्थापन, उत्पादन खर्च कमी करण्याच्या उपाययोजना, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार व अधिक उत्पादन घेण्याच्या पद्धती यांची माहिती देण्यात आली. उपस्थित शेतकऱ्यांनी विविध प्रश्न विचारून तज्ज्ञांकडून शंकानिरसन करून घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहाय्यक कृषी अधिकारी सचिन दत्तात्रेय पाटील, सचिन पाटील आणि भूषण वाघ यांनी परिश्रम घेतले. या मार्गदर्शन कार्यक्रमामुळे परिसरातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती मिळून उत्पादनवाढीस निश्चितच चालना मिळेल, असा विश्वास उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाची सुरुवात मंडळ कृषी अधिकारी ईश्वर पवार यांच्या हस्ते झाली. यावेळी केळी संशोधन केंद्र, जळगावचे डॉ. व्ही. टी. बडगुजर, कृषी विज्ञान केंद्र, ममुराबादचे डॉ. किरण मांडवडे व डॉ. टी. बी. गोरे तसेच जिल्हा उद्योग केंद्र, जळगावचे विजय सैंदाणे यांनी शेतकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. मार्गदर्शनात केळी पिकावरील कीड व रोगांचे प्रभावी व्यवस्थापन, उत्पादन खर्च कमी करण्याच्या उपाययोजना, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार व अधिक उत्पादन घेण्याच्या पद्धती यांची माहिती देण्यात आली.





#### उत्पादन खर्च कमी करण्याच्या उपाययोजना

उत्पादनवाढ आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मंडळ कृषी अधिकारी ईश्वर पवार यांच्या हस्ते झाली. यावेळी केळी संशोधन केंद्र, जळगावचे डॉ. व्ही. टी. बडगुजर, कृषी विज्ञान केंद्र, ममुराबादचे डॉ. किरण मांडवडे व डॉ. टी. बी. गोरे तसेच जिल्हा उद्योग केंद्र, जळगावचे विजय सैंदाणे यांनी शेतकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.मार्गदर्शनात केळी पिकावरील कीड व रोगांचे प्रभावी व्यवस्थापन, उत्पादन खर्च कमी करण्याच्या उपाययोजना, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार व अधिक उत्पादन घेण्याच्या पद्धती यांची माहिती देण्यात आली.

## धुळ्यात एसटी बसच्या छताला गळती

जन सम्राट टाईम्स

**शिंदखेडा (धुळे) | प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा आगाराच्या एसटी बसच्या छताला गळती लागल्याने विद्यार्थ्यांसह प्रवाशांचे हाल झाल्याची घटना समोर आली आहे. बसच्या छतामधून पावसाचे पाणी थेट प्रवाशांवर गळत असल्याने अनेक प्रवासी आणि विद्यार्थी प्रवासादरम्यान भिजले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, एसटी महामंडळाच्या देखभाल व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.अमराळे येथून शिंदखेड्याकडे जाणाऱ्या शिंदखेडा आगाराच्या बसमध्ये हा प्रकार घडला. बसच्या छतामधून सतत पाणी गळत असल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. यानंतर संतप्त प्रवाशांनी या प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला. या



घटनेनंतर परिवहन विभागाच्या कारभारावर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. विद्यार्थी आणि प्रवाशांच्या सुरक्षित व सुखकर प्रवासासाठी शासन प्रयत्नशील असताना, एसटी महामंडळाच्या नियोजनशून्य व निष्काळजी कारभारामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. जुन्या आणि नादुरुस्त बसेस रस्त्यावर धावू देण्याऐवजी त्यांची वेळेवर दुरुस्ती करूनच सेवेत उतरवाव्यात, अशी मागणीही प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

## पारोळ्यात वंचित बहुजन आघाडीचा मोर्चा

जन सम्राट टाईम्स



**पारोळा। प्रतिनिधी:** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पारोळा शहरात बंद पाळून शांततामय मोर्चा काढण्यात आला. केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध करत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दि. २० जुलै २०२६ रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींवर दिल्ली पोलिसांकडून अमानुष लाठीचार्ज करण्यात आल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.

या घटनेच्या निषेधार्थ पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदचे आवाहन केले होते. या पार्श्वभूमीवर पारोळा शहरात तालुका वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत मोर्चा काढला. यावेळी विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध करण्यात आला तसेच केंद्र सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनादरम्यान वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे चुकीचे असल्याचे सांगत केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका केली. यावेळी तालुका व शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घेगडे यांची पीपल्स रिपब्लिकन पक्ष युवक आघाडीच्या अध्यक्षपदी नियुक्ती

जन सम्राट टाईम्स



**मुंबई | प्रतिनिधी:** मुंबईतील युवा उद्योजक विनोद घेगडे यांची प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या नेतृत्वाखालील पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्या युवक आघाडीच्या मुंबई प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांनी बॅलार्ड पियर येथील पक्षाच्या मुख्यालयात नियुक्तीची अधिकृत घोषणा केली. यावेळी जयदीप कवाडे यांनी विनोद घेगडे यांना पुष्पगुच्छ व नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा दिल्या. नियुक्तीनंतर घेगडे यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्त्यांनी पीपल्स रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश केला.

या प्रसंगी फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांच्या गजरात कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांनी बॅलार्ड पियर येथील पक्षाच्या मुख्यालयात नियुक्तीची अधिकृत घोषणा केली. यावेळी जयदीप कवाडे यांनी विनोद घेगडे यांना पुष्पगुच्छ व नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा दिल्या. नियुक्तीनंतर घेगडे यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्त्यांनी पीपल्स रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश केला.

नियुक्तीनंतर घेगडे यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्त्यांनी पीपल्स रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रसंगी फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांच्या गजरात कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांनी बॅलार्ड पियर येथील पक्षाच्या मुख्यालयात नियुक्तीची अधिकृत घोषणा केली. यावेळी जयदीप कवाडे यांनी विनोद घेगडे यांना पुष्पगुच्छ व नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला युवक आघाडीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अमित सोनावणे, पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे नेते कपिल लिंगायत, राजेश उबाळे, राजू लोखंडे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# जीपीएस मित्र परिवाराकडून वारकरी भक्तांना फराळ वाटप

## सुरत-पंढरपूर एक्सप्रेसमधील वारकऱ्यांचे स्वागत



जन सम्राट टाईम्स


**पाळधी| प्रतिनिधी :** आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे निघालेल्या वारकरी भक्तांच्या सेवेसाठी जीपीएस मित्र परिवाराने पाळधी रेल्वे स्थानकावर स्तुत्य उपक्रम राबविला. सुरत-पंढरपूर एक्सप्रेस स्थानकावर थांबताच कार्यकर्त्यांनी प्रत्येक डब्यात जाऊन वारकरी भाविकांना फराळाचे वाटप केले. सेवाभावातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे वारकऱ्यांनी मनापासून स्वागत केले.

पाळधी रेल्वे स्थानकावर सुरत-पंढरपूर एक्सप्रेसला थांबा मिळावा यासाठी जीपीएस मित्र परिवाराने काही दिवसांपूर्वी रेल्वे प्रशासनाकडे निवेदन दिले होते. स्थानिक प्रवासी व वारकऱ्यांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या या पाठपुराव्याला यश मिळाल्याने परिसरात समाधानाचे वातावरण आहे. यावेळी युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी भविष्यात खानदेश एक्सप्रेस तसेच सुरत-भुसावळ रात्रीची पॅसेंजरलाही पाळधी येथे नियमित थांबा देण्याची मागणी केली. या दोन्ही गाड्यांचा थांबा परिसरातील हजारो प्रवाशांसाठी महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

दुपारी सुमारे एकच्या सुमारास रेल्वे स्थानकावर एक्सप्रेस दाखल होताच कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने प्रत्येक डब्यात जाऊन कोणताही वारकरी फराळापासून वंचित राहणार नाही, याची विशेष काळजी घेतली. प्रतापराव पाटील यांनी स्वतः प्रत्येक डब्यात जाऊन वारकरी भाविकांची भेट घेत त्यांच्या प्रवासाची विचारपूस केली आणि सुखरूप वारीच्या शुभेच्छा दिल्या. वारी ही सेवा, समर्पण आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारी परंपरा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या उपक्रमात जीपीएस मित्र परिवाराचे ज्येष्ठ सदस्य हेमंत नारखेडे (बंडूकाका) यांचा उत्साह विशेष लक्षवेधी ठरला. वयाच्या ६५व्या वर्षीही त्यांनी फराळ वितरण, डब्यांचे नियोजन आणि संपूर्ण उपक्रमाचे समन्वयन करत कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली. वारकरी भाविकांनी या सेवाभावी उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत जीपीएस मित्र परिवाराच्या कार्यकर्त्यांचे आभार मानले. आरोग्य, शिक्षण, रक्तदान, नेत्रतपासणी आणि जनजागृतीसारखे विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविणाऱ्या जीपीएस मित्र परिवाराने वारीतील फराळ वाटपातून सामाजिक बांधिलकीची आणखी एक प्रेरणादायी परंपरा कायम ठेवली.

# जिल्हा बँकेच्या भंगार विक्री व MIDC तील P-5 जागेच्या व्यवहारावर प्रश्नचिन्ह

## माहिती देण्यास टाळाटाळचा आरोप



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या भंगार साहित्य विक्री प्रक्रियेसह एमआयडीसी परिसरातील P-5 जागा नेमकी कोणाला, कोणत्या अटींवर आणि कोणत्या मंजुरीच्या आधारे भाड्याने देण्यात आली, याबाबत माहिती देण्यास बँक प्रशासन टाळाटाळ करत असल्याचा आरोप समोर आला आहे. लोकनियुक्त सरपंच सुरेशआप्पा पाटील (झुरखेडा) यांनी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापक यांच्याकडे या दोन्ही व्यवहारांची सविस्तर माहिती मागितली आहे. यापूर्वी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव यांनीही संबंधित प्रकरणात बँकेकडून माहिती मागविल्याचे सांगितले जात असून, ती वरिष्ठ स्तरावरही उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे, "राज्याच्या प्रधान सचिवांनाही माहिती दिली जात नसेल, तर सामान्य नागरिकाला ती कशी मिळणार?" असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. निवेदनात भंगार साहित्याची संपूर्ण यादी, मूल्यांकन अहवाल, संचालक मंडळ व सर्वसाधारण सभेचे ठराव, लिलावाची जाहिरात, निविदा प्रक्रिया, सहभागी बोलीदारांची यादी, अंतिम मंजुरी आदेश, छायाचित्रे, व्हिडिओ रेकॉर्डिंग तसेच लिलावातून प्राप्त झालेल्या रकमेचा संपूर्ण तपशील उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच एमआयडीसी परिसरातील P-5 जागेच्या भाडेपट्ट्याशी संबंधित मंजुरी आदेश, करारनामा, मूल्यांकन अहवाल, निविदा प्रक्रिया, भाडे निश्चितीचा आधार आणि संबंधित व्यवहाराची संपूर्ण माहितीही देण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित माहिती वेळेत उपलब्ध करून न दिल्यास किंवा माहिती जाणीवपूर्वक दडविल्याचे आढळल्यास सहकार विभाग, निबंधक कार्यालय तसेच इतर सक्षम प्राधिकरणांकडे तक्रार दाखल करून आवश्यक असल्यास न्यायालयीन मार्गाचा अवलंब करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# हतनूर धरणाचे चार दरवाजे उघडले



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी:** तापी नदीवरील हतनूर धरण प्रकल्पातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत असल्याने धरणाचे चार वक्राकार दरवाजे प्रत्येकी ०.५० मीटरने उघडण्यात आले आहेत. यामुळे तापी नदीपात्रात १४८ घनमीटर प्रति सेकंद (सुमारे ५,२२७ क्युसेक) वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असून, नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. बुधवार, २२ जुलै रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत धरणातील एकूण जलसाठा २६८.५० दशलक्ष घनमीटर (६९.२० टक्के) इतका झाला आहे. तर उपयुक्त (लाइव्ह) जलसाठा १३५.५० दशलक्ष घनमीटर (५३.१४ टक्के) इतका नोंदविण्यात आला आहे. हतनूर धरणाची पूर्ण जलसाठा पातळी २१४.००० मीटर असून, सध्या धरणातील पाण्याची पातळी २११.७५० मीटर इतकी आहे. दरम्यान, कालव्यामधून ५.६६ घनमीटर प्रति सेकंद (२०० क्युसेक) पाणी सोडण्यात येत असून, आर.एस. गेटद्वारे कोणताही विसर्ग करण्यात आलेला नाही. धरण परिसरात बुधवारी १२ मिमी पावसाची नोंद झाली असून, चालू पावसाळ्यातील एकूण पर्जन्यमान १३३ मिमी इतके झाले आहे. धरणातून तापी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नदीकाठच्या गावांतील नागरिक, शेतकरी आणि मच्छीमारांनी नदीपात्रात जाणे टाळावे तसेच प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन संबंधित प्रशासनाने केले आहे.

# राज्यसभेचे कामकाज 24 जुलैपर्यंत स्थगित

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली | प्रतिनिधी : संसदेच्या चालू मान्सून अधिवेशनात गुरुवारी पुन्हा एकदा सत्ताधारी पक्ष आणि विरोधकांमध्ये विविध मुद्द्यांवरून तीव्र खडाजंगी झाली. सभागृहात झालेल्या गदारोळामुळे नियमित कामकाजावर परिणाम झाला आणि राज्यसभेचे कामकाज अखेर २४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले. कामकाज सुरू होताच विविध विषयांवरून विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली, तर सत्ताधारी सदस्यांनीही त्यास जोरदार प्रत्युत्तर दिले. दोन्ही बाजूंतील घोषणाबाजी आणि गोंधळामुळे सभागृहात शिस्त राखणे कठीण झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर सभापीठाने राज्यसभेची कार्यवाही शुक्रवार, २४ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्याचा निर्णय घेतला. मान्सून अधिवेशनाच्या सुरुवातीपासूनच विविध राजकीय आणि राष्ट्रीय मुद्द्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सातत्याने संघर्ष पाहायला मिळत असून, त्यामुळे संसदेच्या कामकाजावर वारंवार परिणाम होत आहे.

# महाराष्ट्र बंदला सोयगावात उत्स्फूर्त प्रतिसाद!

जन सम्राट टाईम्स



**सोयगाव । प्रतिनिधी:** राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या आवाहनानुसार गुरुवार, दि. 23 जुलै रोजी पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदला सोयगाव तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवत बंदला पाठिंबा दर्शविला. या बंदमध्ये भारतीय बौद्ध महासभा, वंचित बहुजन आघाडी, समता सैनिक दल तसेच विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी सहभाग घेतला. शांततामय वातावरणात बंद पाळण्यात आला. बंद यशस्वी करण्यासाठी व्यापारी, नागरिक आणि विविध संघटनांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केल्याबद्दल आयोजकांनी सर्वांचे आभार मानले. व्यापारी बांधवांनी दाखविलेल्या सहकार्याचे स्वागत करत लोकशाही मार्गाने आंदोलनाला पाठिंबा दिल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

# उमेद अभियानातील ३८ मशीन बंद; भ्रष्टाचाराच्या चौकशीची मागणी

## महिलांचा आंदोलनाचा इशारा



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** उमेद अभियान व मानव विकास योजनेअंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणासाठी वितरित करण्यात आलेल्या ३८ मशीन बंद अवस्थेत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते आणि महिला बचत गटांनी केला आहे. निकृष्ट दर्जाच्या मशीनचे वाटप करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ते बापू बागुल, सखी महिला ग्रामसभा बचत गटाच्या भारती माळी आणि बचत गटातील महिलांनी पत्रकार परिषद घेऊन ही मागणी केली. जिल्हास्तरापासून वरिष्ठ स्तरापर्यंत वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याचा आरोप करत ९ ऑगस्टपासून बिऱ्हाड आंदोलन सुरू करण्यात येईल, तसेच १५ ऑगस्टपर्यंत न्याय न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशाराही देण्यात आला. माहितीनुसार, धुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामीण जीवनोन्नती अभियान आणि मानव विकास योजना यांच्या माध्यमातून सन २०२२-२३ मध्ये धुळे तालुक्यातील महिला बचत गटांना उद्योगासाठी विविध प्रकारच्या ३८ मशीनचे वाटप करण्यात आले होते. मात्र, कालांतराने ही यंत्रे निकृष्ट दर्जाची असल्याने बंद पडली असून त्यामुळे महिलांच्या रोजगारावर परिणाम झाला असल्याचा दावा करण्यात आला. विश्वनाथ येथील मशीन युनिट पूर्णपणे बंद अवस्थेत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. शासनासह महिलांची फसवणूक करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली. पत्रकार परिषदेला दक्ष पत्रकार संघाचे बापू बागुल, शंकर खरात, सखी महिला ग्रामसभा बचत गटाच्या भारती माळी यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचा गौरव

## धुळेच्या डॉ. जितेंद्र जवराज यांना प्रतिष्ठेचा ‘महा अक्युपंक्चर रत्न पुरस्कार-2026’

जन सम्राट टाईम्स



**धुळ | प्रतिनिधी :** धुळे येथील सुप्रसिद्ध फिजिओथेरपिस्ट व अक्युपंक्चरिस्ट डॉ. जितेंद्र नामदेव जवराज यांना आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन (AGMA) च्या वतीने ‘महा अक्युपंक्चर रत्न पुरस्कार-2026’ या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार 19 जुलै रोजी छत्रपती संभाजीनगर येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित भव्य सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अक्युपंक्चर क्षेत्रात उल्लेखनीय योगदान आणि रुग्णसेवेत केलेल्या कार्याची दखल घेत डॉ. जवराज यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान देण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यास महाराष्ट्रातील मोठ्या संख्येने अक्युपंक्चरिस्ट, वैद्यकीय तज्ज्ञ आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मराठी चित्रपट अभिनेते डॉ. सुयोग गोऱ्हे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. नाझेर काझी, ॲड. दत्तात्रय जाधव आणि ॲड. नागेश सोनुने उपस्थित होते. यावेळी आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे चेअरमन डॉ. करोळे, व्हाइस चेअरमन डॉ. नितीन राजे पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबुराव कानडे, डॉ. अभिजित कवडकर, प्रशांत सावंत, सौ. चव्हाण, डॉ. राजेंद्र गोऱ्हे तसेच संस्थेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ. जवराज यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान

धुळे येथील सुप्रसिद्ध फिजिओथेरपिस्ट व अक्युपंक्चरिस्ट डॉ. जितेंद्र नामदेव जवराज यांना आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन (AGMA)च्या वतीने ‘महा अक्युपंक्चर रत्न पुरस्कार-2026’ या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार 19 जुलै रोजी छत्रपती संभाजीनगर येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित भव्य सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अक्युपंक्चर क्षेत्रात उल्लेखनीय योगदान आणि रुग्णसेवेत केलेल्या कार्याची दखल घेत डॉ. जवराज यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान देण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यास महाराष्ट्रातील मोठ्या संख्येने अक्युपंक्चरिस्ट, वैद्यकीय तज्ज्ञ आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मराठी चित्रपट अभिनेते डॉ. सुयोग गोऱ्हे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. नाझेर काझी, ॲड. दत्तात्रय जाधव आणि ॲड. नागेश सोनुने उपस्थित होते.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306